काही वास्तुविशारद यांनी माझे निदर्शनास आणुन दिली व यात आणखी सुधारणा कराव्यात अशी विनंती केली. परिपत्रक क्र. १४१ प्रमाणे अहवाल तयार करणे, अधिकाऱ्यांच्या गटाची बैठक घेणे व त्यांची चर्चा होऊन इतिवृत्त तयार होणे व पुढे ते मंजुरीसाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा यांचे कडे पाठविणे यास वेळ लागत असल्याने, परिपत्रक क्र. १४१ मध्ये काही बदल करुन नव्याने हे परिपत्रक निर्गमित करण्यात येत आहे. या बदलामुळे कामात गती येईल अशी धारणा आहे.

आता खालील प्रमाणे कार्यपध्दती निश्चित करण्यात येत आहे.

१. नियो. संस्थेचे मुख्य प्रवर्तक / विकासक/ वास्तुविशारद हे विहीत नमुन्यातील अर्ज परिशिष्ट I ते V आवश्यक कागदपत्रांसह, दोन प्रतीत (दोन संच) मुख्य लिपीक, अभियांत्रिकी विभाग, झोपुप्रा यांचे कडे समक्ष सादर करतील.

२. मुख्य लिपीक, अभियांत्रिकी विभाग, झोपुप्रा हे अर्जात नमुद भूखंडावर पुर्वी प्राधिकरणाकडे योजना दाखल आहे अगर कसे याबाबत छाननी करुन तसा शेरा अर्जावर नमुद करतील. यापुर्वी योजना दाखल असल्यास अर्ज तेथेच नाकारण्यात येईल.

३. मुख्य लिपीक, अभियांत्रिकी विभाग यांना दाखल करुन घ्यावयाचा अर्ज योग्य आढळल्यास अर्जावर स्विकारण्यास योग्य असा शेरा नमुद करुन अर्ज, अर्जदार यांना समक्ष परत देतील.

४. सदर अर्ज अर्जदार हे संबधित कार्यकारी अभियंता यांना हातोहात सादर करतील.

५. कार्यकारी अभियंता अर्ज स्वत: स्विकारतील. अर्जासोबत परिशिष्ट निहाय आवश्यक कागदपत्रे असल्याची स्वत: खात्री करतील. तद्नंतर अर्ज स्विकारुन तो नियमीत टपालामार्फत नोंदवुन घेतील. अपुर्ण अर्ज नाकारण्यात येईल.

६. टपालाने नोंदवुन अर्ज कार्यकारी अभियंता यांचे कडे आल्यानंतर परिशिष्ट निहाय अनुक्रमणिकेच्या प्रती सह कागदपत्र खालील विभागाकडे पाठवितील. एक संच त्यांच्याकडे कायम स्वरुपी ठेवतील.

| अ. क्र. | परिशिष्ट | संबधीत विभाग |
|---|---|---|
| १ | परिशिष्ट - I | अभियांत्रिकी विभाग |
| २ | परिशिष्ट - II | उपजिल्हाधिकारी विभाग |
| ३ | परिशिष्ट - III | वित्त विभाग |
| ४ | परिशिष्ट - IV | नगर भूमापन विभाग |
| ५ | परिशिष्ट - V | सहकार कक्ष |

७. परिशिष्ट - I चा विहीत नमुना व त्यासोबत प्राप्त कागदपत्रांची छाननी करुन संबधित कार्यकारी अभियंता हे आपले स्वयंस्पष्ट अभिप्राय तयार करतील.

८. परिशिष्ट - II सोबत प्राप्त कागदपत्रांची छाननी करुन उपजिल्हाधिकारी, झोपुप्रा हे आपले स्वयंस्पष्ट अभिप्राय कार्यकारी अभियंता,झोपुप्रा यांना पाठवतील.

९. परिशिष्ट - III सोबत प्राप्त कागदपत्रांची छाननी करुन वित्त नियंत्रक, झोपुप्रा हे आपले स्वयंस्पष्ट अभिप्राय कार्यकारी अभियंता,झोपुप्रा यांना पाठवतील.

१०. परिशिष्ट - IV सोबत प्राप्त कागदपत्रांची छाननी करुन नगर भूमापन अधिकारी, झोपुप्रा हे आपले स्वयंस्पष्ट अभिप्राय कार्यकारी अभियंता,झोपुप्रा यांना पाठवतील.

११. परिशिष्ट - V सोबत प्राप्त कागदपत्रांची छाननी करुन सह. निबंधक, झोपुप्रा वा सहा. निबंधक, झोपुप्रा हे आपले स्वयंस्पष्ट अभिप्राय कार्यकारी अभियंता,झोपुप्रा यांना पाठवतील.

१२. वरील प्रमाणे सर्व विभाग प्रमुखांचे स्वयंस्पष्ट अभिप्राय संबधित विभागाच्या कार्यकारी अभियंता, अभियांत्रिकी विभाग, झोपुप्रा यांचे कडे प्राप्त झाल्यानंतर प्राप्त प्रस्तावांची छाननी करुन कार्यकारी अभियंता प्रस्ताव स्विकारणे / नाकारणे याबाबत आवश्यक कार्यवाही करतील.

१३. प्रस्ताव स्विकारणे बाबतच्या निर्णयानंतर कार्यकारी अभियंता स्विकृती शुल्क (Acceptance Fees) वसुल करतील.

१४. प्रस्ताव नामंजुर झाल्यास कार्यकारी अभियंता, झोपुप्रा हे अर्जदार यांना तसे लेखी कळवितील.

योजना स्विकृती / अस्विकृती बाबत उपरोक्त सर्व कार्यवाही प्राधिकरणाव्दारे निर्गमीत नागरीकांच्या सनदे मध्ये नमुद विहीत मुदतीमध्ये करणे बाबत सर्व विभागप्रमुखांनी दक्षता घेणेची आहे.

वरील प्रमाणे झोपडपट्टी पुनर्वसन योजने बाबतचा प्रस्ताव स्विकारण्याची कार्यपध्दती निश्चित करण्यात येत आहे. याप्रमाणे सर्व संबंधितानी कार्यवाही करावी. यापुर्वी दि०४/०५/२०१३ रोजी निर्गमित करण्यात आलेले परिपत्रक क्र. १४१ याव्दारे रद्द करण्यात येत आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण.

प्रत - सर्व विभाग प्रमुख / झोपुप्रा

360